महाराष्ट्र शासन

सहकार पणन व वस्त्रोद्योग विभाग

वस्त्रोद्योग आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, नागपूर

जुने सचिवालय इमारत, जी.पी.ओ.समोर, सिव्हील लाईन्स, नागपूर- ४४०००१

दूरध्वनी : ०७१२ २५६१२४७ ईमेल commissionertex@gmail.com

जा.क्र.कार्या-५/वस्त्रो.धोरण/ व्याजअनुदान/ 3693 /२०२६, दिनांक: 18 JUN 2026

प्रति,

राज्यातील सर्व संबंधित घटक

विषय: वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत व्याज अनुदानाचे प्रस्ताव स्विकारण्याकरिता अंतिम मुदत देणेबाबत.

संदर्भ:- शासन पत्र क्र. धोरण-११२६/प्र.क्र.७३/टेक्स-५, दिनांक- १७ जून, २०२६

उपरोक्त संदर्भिय विषयास अनुसरुन, राज्याचे वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत, केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत, दीर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना लागू होऊन १४ वर्षे झाली असल्याने, ज्या वस्त्रोद्योग घटकांचे व्याज सवलतीचे उर्वरीत क्लेम बँकेमार्फत आयुक्तालयास सादर करणे बाकी आहे, त्या वस्त्रोद्योग घटकांनी संबंधित बँकेकडून उर्वरीत व्याज सवलतीचे क्लेम दिनांक ३० जून, २०२६ पर्यंत आयुक्तालयास ऑनलाईन सादर करण्याबाबत, संदर्भिय पत्रान्वये अंतिम मुदत दिली आहे.

त्यानूसार, ज्या वस्त्रोद्योग घटकांनी यापूर्वी व्याज सवलतीचे क्लेम बँकेमार्फत आयुक्तालयास सादर केले आहेत, परंतू उर्वरीत क्लेम अद्यापही बाकी आहेत. त्या वस्त्रोद्योग घटकांनी संबंधित बँकेकडून उर्वरित व्याज सवलतीचे क्लेम दिनांक ३० जून, २०२६ पर्यंत आयुक्तालयास ऑनलाईन पध्दतीने सादर करावेत. तसेच दिनांक ३० जून, २०२६ नंतर आयुक्तालयास ऑनलाईन प्राप्त होणारे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घेण्यात यावी.

Digitally signed by
Sanjay Bhayyaji Daine
Date: 18-06-2026
18:24:20

संजय दैने (भा.प्र.से.)
आयुक्त, वस्त्रोद्योग
महाराष्ट्र राज्य, नागपूर

महाराष्ट्र शासन
सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग,
तिसरा मजला, मंत्रालय विस्तारित इमारत,
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,मंत्रालय, मुंबई०३२ ४०० -
Email:-textilepolicy-mah@nic.in

क्रमांक : धोरण-११२६/प्र.क्र.७३/टेक्स-५ दिनांक:- १७ जून, २०२६

प्रति,

आयुक्त (वस्त्रोद्योग)
वस्त्रोद्योग आयुक्तालय,
नागपूर.

विषय:- वस्त्रोद्योग धोरण २०११-१७ अंतर्गत व्याज अनुदानाचे प्रस्ताव स्विकारण्याकरिता अंतिम मुदत देणेबाबत....

संदर्भ:- आयुक्त, वस्त्रोद्योग आयुक्तालय, नागपूर यांचे पत्र क्र. कार्या-५/वस्त्रो.धोरण/व्याज अनुदान/३५०५/२०२६, दि.०५ जून, २०२६.

महोदय,

उपरोक्त विषयावरील संदर्भाधिन पत्राच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, वस्त्रोद्योग धोरण, २०११-१७ अंतर्गत केंद्र पुरस्कृत TUFS योजनेशी निगडीत दीर्घ मुदती कर्जावर व्याज सवलत योजना लागू होऊन १४ वर्षे झाली असल्याने ज्या वस्त्रोद्योग घटकांचे व्याज सवलतीचे उर्वरीत क्लेम बँकेमार्फत आयुक्तालयास सादर करणे बाकी आहे, त्या वस्त्रोद्योग घटकांना संबंधित बँकेकडून उर्वरित व्याज सवलतीचे क्लेम सादर करण्याबाबत दिनांक ३० जून, २०२६ पर्यंतची अंतिम मुदत देण्याबाबत शासन मान्यता देण्यात आली आहे. त्यानुसार संबंधित वस्त्रोद्योग घटकांना बँकेकडून उर्वरित व्याज सवलतीचे क्लेम सादर करण्याबाबत दिनांक ३० जून, २०२६ पर्यंतची अंतिम मुदत आपल्या स्तरावरुन कळविण्यात यावी. तसेच ज्या वस्त्रोद्योग घटकांचे क्लेम दि.३०.०६.२०२६ पर्यंत प्राप्त होणार नाहीत, अशा वस्त्रोद्योग घटकांचे व्याज सवलतीचे प्रस्ताव विचारात घेतले जाणार नाहीत, याची नोंद घेण्याबाबतसुध्दा कळविण्यात यावे, ही विनंती.

आपला,

Digitally signed by
Harishkumar Shrikrushna Kamble
Date: 17-06-2026 12:35:18

(हरिषकुमार कांबळे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत: निवडनस्ती (टेक्स-५)